<u>नि. फौ. ख. क्र.१३०/२०१८</u> निशाणी क्र.४३

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – कृष्णराव उर्फ गजानन श्रीराम तेलगोटे

वय – ५४ वर्षे, व्यवसाय – तहसिल कार्यालय, दस्तलेखक

पत्ता – रा. नवानगर, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास दुपारी ३.२० वा. सुरुः</u>**

१. मी सर्व आरोपींना ओळखतो. आम्ही शेजारी राहतो. मी नवानगर बाळापूर येथे राहतो. घटना दिनांक ०२.०७.२०१८ रोजी सकाळच्या वेळेमध्ये घडली होती. माझा भाऊ नामे सुखराम तेलगोटे हा त्यांची स्वतःची जागा पाहण्यासाठी गेला असता तेथे आरोपींसोबत त्याचा वाद झाला होता. वाद झाला त्यावेळी मी घरी होतो. माझे राहते घर आणि घटनास्थळ यामध्ये अंदाजे २५०–३०० मी. अंतर आहे. माझा भाऊ सुखराम यांना मारपीट झाल्यामुळे ते पडलेले होते. तेवढ्यात माझी मोठी भावजयने मला आवाज दिला, त्यामुळे मी धावत गेलो. त्यामुळे घटनास्थळी गेलो असता सुखराम पडलेले दिसले. मी सुखराम यांना पाहिले असता त्यांचा एक कान तुटलेला दिसला, आणि पाय फ्रॅक्चर झाला होता. मी पोलीसांना कॉल केल्यावर पोलीस घटनास्थळी आले. त्यानंतर मी स्वतः सुखराम यांना अकोला येथील सरकारी दवाखान्यात घेवून गेलो. बाळापूर येथील सरकारी दवाखान्यात भरती करुन न घेतल्यामुळे अकोला येथील सरकारी दवाखान्यात गेलो होतो.

२. दवाखान्यात गेलो त्यावेळी पोलीस आमच्या सोबत होते. सुखराम दवाखान्यात असताना पोलीसांनी त्यांच्याकडे घटनेविषयी चौकशी केली होती. चौकशी केली त्यावेळी सुखराम याने सविस्तर घटना पोलीसांना सांगितली आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | सुखराम झालेल्या जखमा कशामुळे झाल्या ? |
| **उत्तरः** | मारपीट केल्यामुळे. |
| **प्रश्न :** | सुखरामला कोणी मारपीट केली ?<br>सदर प्रश्नास आरोपीचे विधीज्ञ <u>श्री. आर. एन. वानखडे यांनी असा आक्षेप घेतला की</u>, सदर विधान हे प्रश्न असल्यामुळे असा प्रश्न त्यांना विचारता येणार नाही.<br><u>आदेशः</u> सरकारी विधीज्ञांनी विचारलेले विधान हा प्रश्न असून तो प्रश्न उत्तर सुचक प्रश्न नसल्यामुळे आरोपींच्या विधीज्ञांनी घेतलेला आक्षेप फेटाळण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| **उत्तरः** | आरोपी लोकांनी. |

३. सर्व आरोपी आज रोजी न्यायालयात हजर असून मी त्यांना ओळखतो. त्यानंतर दि.०९.०७.२०१८ पोलीस माझ्या घरी आले होते, त्यावेळी त्यांनी माझे बयाण घेतले होते. पोलीसांनी लिहून घेतलेले बयाण माझ्या सांगण्याप्रमाणे लिहून घेतलेले आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एन. वानखडे यांचे मार्फतः–</u>**

४. दि.०२.०७.२०१८ रोजी मी माझ्या घरी होतो. दि.०२.०७.२०१८ रोजी रविवार होता.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | दि.०१.०७.२०१८ रोजी तुम्ही कामावर गेले होते का ? |
| **उत्तरः** | नाही, मी घरीच होतो. |

५. सन १९९३ पासून मी तहसिल कार्यालयामध्ये काम करतो. स्वतःहून सांगतो की, तहसिल कार्यालयात काम करण्यापुर्वी ॲड. एस. टी. इंगळे यांचे कारकून म्हणून मी न्यायालयात सुध्दा काम केलेले आहे. ॲड. एस. टी. इंगळे वकील साहेब फौजदारी प्रकरणामध्ये वकीली करतात. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. एस. टी. इंगळे यांच्याकडे मी कारकून म्हणून काम केले असल्यामुळे मला फौजदारी प्रकरणाशी संबंधित अर्ज/तक्रारी कशाप्रकारे लिहीतात याची मला माहिती आहे. स्वतःहून सांगतो की, सदर प्रकरणातील तक्रारी/अर्ज मी लिहीलेले नाहीत. ॲड. एस. टी. इंगळे साहेब यांच्या पोलीस स्टेशन, बाळापूर येथे ओळखी आहेत किंवा नाहीत या विषयी त्यांनाच माहित असेल. हे म्हणणे खरे नाही की, मी कोर्टात आणि तहसिल कार्यालयात काम केलेले असल्यामुळे माझ्या सुध्दा पो.स्टे.मध्ये ओळखी आहेत.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | ज्या ठिकाणी तुम्ही गेले होते ती जागा सुखराम तेलेगोटे यांच्या नावाने आहे का? |
| **उत्तरः** | नाही. सुखराम तेलेगोटे यांच्या नावाने नसून त्यांच्या मुलाच्या नावाने आहे. जागेची नोंद नगरपरिषदला आहे. |

६. आरोपी विलास हिवराळे हे बाळापूर येथील अकोला नाका येथे राहतात. विलास हिवराळे हे पुर्वी चंद्रपुर येथील पॉवर हाऊस मध्ये कामाला होते. विलास हिवराळे हे चंद्रपुर येथील पॉवर हाऊस नंतर कोठे नोकरी केली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, चंद्रपुर नंतर विलास हिवराळे यांची बदली पारस येथील पॉवर हाऊसमध्ये झाली होती आणि तेथे त्यांना कॉर्टर मिळाले होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही घटनास्थळी गेले होते त्यावेळी सुखराम तेलगोटे हे नालीत पडलेले होते का ? |
| **उत्तरः** | होय. |

७. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेविषयी मला काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ सुखराम तेलगोटे यांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या जबाबामध्ये लिहीलेल्या मजकूराविषयी मला काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी नामे दिलीप याची पत्नी एकटीच घरी असताना सुखराम तेलगोटे याने तिचा विनयभंग केला होता आणि तेथून पळून जात असताना तो नालीत पाय अटकून पडला. हे म्हणणे खरे नाही की, याच कारणास्तव तो पाय अडकून नालीत पडल्यामुळे त्याच्या कानाला जखम झाली होती आणि पाय मोडला होता. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी जी जागा स्वतःची आहे असे सांगतो ती जागा त्याला हडप करायची होती म्हणून त्याने आरोपीं विरुध्द खोटा रिपोर्ट दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुखरामच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास दुपारी ३.४५ वा. पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २७.०३.२०२५**

**समक्ष**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

VISHNU DATTARAO GITE
Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.03.27 16:03:04 +0530

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २७/०३/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २७/०३/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २७/०३/२०२५ |